रायगड - तक्रार क्र. 136

(136)


महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१
❖ दुरध्वनी क्र : ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२ ❖ फॅक्स क्र : ०२१४१-२२७४५१ ❖
❖ ई-मेल : tahasildarmahasul@gmail.com ❖


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक:सशा/जमीन/अ-०३/कांदळवन/५८४३६/२०२२/२०२३ दिनांक: /०१/२०२३

03/02/2023

प्रति,
मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,
३०२, वेक फिल्ड हाउस, ३ रा मजला,
ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्ड ईस्टेट,
फोर्ट, मुंबई-४००००१.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई
आवक क्र: 4884 दिनांक: 03/03/23
प्रशासकीय अधिकारी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

**विषय:- Destruction of Mangroves at Bhagat Aali, Awas, Alibaug.**
**(तक्रार क्र. १३६)**

संदर्भ:- आपलेकडील पत्र जा.क्र.ल.ले./कां.स./५१/सन २०२१-२२ दिनांक २४/०९/२०२१

महोदय,

उपरोक्त विषयान्वये अर्जदार श्री. प्रसाद खाले यांनी आपल्या कार्यालयाकडे ईमेलव्दारे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जाचे अनुषंगाने तहसिलदार अलिबाग यांनी उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांजकडे सादर केलेल्या अहवालान्वये उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांनी त्यांचेकडील दिनांक ०१/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये खालील नमुन्यात अहवाल सादर केलेला आहे.

**कांदळवन/पाणथळ तक्रारीचा पुर्तता अहवाल**

| अ.क्र. | तक्रारीचा तपशिल | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| १. | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री. प्रसाद खाले, रा. सिनियर कन्सर्वेशन ऑफिसर, कन्सर्वेशन ॲक्शन ट्रस्ट मुंबई, ५ सहकार भवन, पहिला मजला, एल.बी.एस. रोड, नारायण नगर, घाटकोपर (प.) मुंबई-४०००८६ दिनांक १६/१०/२०२० |
| २. | तक्रारीचा विषय | **Destruction of Mangroves at Bhagat Aali, Awas, Alibaug.** |
| ३. | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा.स.नं.गावाचे नांव, तालुका | मौजे आवास (भगत आळी), ता. अलिबाग, जि. रायगड |
| ४. | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | १) तहसिलदार अलिबाग<br>२) परीक्षेत्र वन अधिकारी, अलिबाग<br>३) मंडळ अधिकारी, सारळ |
| ५. | चौकशीमध्ये आढळुन आलेली वस्तुस्थिती | मौजे आवास येथील वादग्रस्त तक्रारी जागा ही वन विभाग, बंदर खाते व महसूल खाते यांचे असल्याबाबत मौजे आवास गाव अभिलेख ७/१२ सदरी नोंदी असल्याचे दिसून येत नाही. सदर जागा ही समुद्रालगत असून अनसर्व्हे नंबर पैकी आहे. समुद्र किनाऱ्यापासून पश्चिम -दक्षिण पूर्णत: खारफुटी (कांदळवन) झाडे आहेत. सदर जागेच्या पूर्वेस अनसर्व्हे नंबर जागेपैकी अंदाजे क्षेत्र ०-०८-०० हे.आर. गुंठे जागा मोकळी आहे. सदर जागेमध्ये यापूर्वी अंदाजे १२ ते १५ वर्षापूर्वी माती व मुरुमचा भराव केले असल्याचे दिसून येते. सदर जागेवर पूर्वीपासून जुने टाकळयाचे झाड व इतर इतर झाडे असल्याचे दिसून आले आहे. तसेच सदर जागेमध्ये आवास (भगत आळी) या गावाचे लोक सार्वजनिक हितासाठी वापर करत असल्याचे दिसून आले आहे. सदर जागेचा वापर भगत आळी येथील मुले खेळण्यासाठी करीत आहेत. सदर जागेवर आजरोजी खारफुटी झाडांची तोड, मातीचा भराव व कांदळवन झाडांची जाळपोळ कोणत्याही अज्ञात व्यक्तीने सदर जागेमध्ये कांदळवन झाडांची तोड केली असल्याचे समक्ष संयुक्त स्थळपाहणी केली |

Mangrove
Committee

| | | |
|---|---|---|
| | | असता दिसून आले नाही. सदर जागेमध्ये वैयक्तिक स्वरुपाचे कोणाचेही अतिक्रमण तसेच श्री. श्रीनिवास बाळाराम भगत यांनी जागेमध्ये अतिक्रमण केले असल्याचे आमच्या स्थळपाहणी करते वेळी निदर्शनास आले नाही. तसेच संयुक्त स्थळपाहणी अंतर्गत मौजे आवास येथील समुद्रालगत असलेल्या अनसर्व्हे नंबर खाजण जागेपैकी पुर्वेस मोकळया (कांदळवन) नसलेल्या अंदाजे क्षेत्र ०-०८-०० हे.आर. या क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारे कांदळवनाच्या झाडांची तोड करुन जाळपोळ व मातीचा भराव केल्याचे संयुक्त पाहणी केली असता आज रोजी दिसून आले नाही.<br>परिक्षेत्र वन अधिकारी, अलिबाग यांचा MRSAC नकाशासह पुढील प्रमाणे अहवाल सादर केला आहे.<br>१) तक्रारदार यांनी तक्रारीत नमूद केल्यानुसार खाडी पुलाच्या लगत कांदळवनाची कत्तल तोड व जाळपोळ करुन भराव करुन जागेवर अतिक्रमण केलेल्या क्षेत्राची पाहणी केली.<br>२) सदर क्षेत्राच्या पाहणी नुसार फार पूर्वी भराव झाल्याचे दिसून येत आहे. तसेच सदर ठिकाणी सार्वजनिक रस्ता, स्मशानभूमी शेड, सार्वजनिक शौचालय तसेच सुमारे ४० ते ५० मीटर लांबीची व सुमारे २ ते ३ मीटर रुंदीचा समुद्राकडे जाणारा रस्ता आहे.<br>३) श्री. श्रीनिवास बाळाराम भगत, रा. भगत आळी यांचे राहते घरालगत पक्का रस्ता असून रस्त्यालगत असलेले कांदळवनामध्ये जुना भराव केलेला दिसून येत आहे. सदर क्षेत्रामध्ये जाळपोळ करुन कत्तल केल्याचे दिसून येत नाही. तसेच त्याबाबतच्या खाणाखुणा दिसून येत नाहीत. सदर भरावावर टाकळी/रेनट्रीची दोन झाडे आहेत. तसेच भराव शेजारील क्षेत्रात कांदळवन दिसून येत आहे.<br>४) अर्जात नमूद केलेले जे क्षेत्र आहे ते वन विभागाच्या ताब्यातील नसून बिन नंबरी शासकीय जागा दिसून येत आहे. याबाबत तलाठी आवास यांनी सदर क्षेत्राचा ७/१२ नसल्याचे सांगितले. सदर क्षेत्र वनसंज्ञा, राखीव वन, संरक्षित वन मध्ये मोडत नाही. तसेच क्षेत्रामध्ये वन नाही.<br>५) अर्जदार यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे झालेला भराव कांदळवनाची कत्तल, जाळपोळ गोष्टी नक्की कोणी केल्या आहेत याबाबींचा सद्य:स्थितीत उलगडा होत नसल्याचे व सदरची जागा ही वन विभागाच्या ताब्यातील नसल्याने सदर क्षेत्राचा ताबा हा महसूल विभागाकडे असल्याने सदर क्षेत्राची चौकशी महसूल विभागाकडून होणे संयुक्तिक वाटते.<br>प्रस्तुत प्रकरणी परिक्षेत्र वन अधिकारी अलिबाग व संयुक्त स्थळ निरीक्षणावरुन खालील प्रमाणे निष्कर्ष निघतो.<br>१) गुगल ईमेजची व MRSAC नकाशा पडताळणी केली असता, सन २००५ व २०१० च्या ईमेजची कांदळवन दिसून येत आहे. सन २०१५ व २०२० च्या ईमेजमध्ये कांदळवन दिसून येत नाही.<br>२) एकंदरीतच सन २०१० पूर्वी या क्षेत्रामध्ये कांदळवन असल्याचे स्पष्ट होते. परंतु मंडळ अधिकारी, सारळ व परिक्षेत्र वन अधिकारी, अलिबाग यांच्या संयुक्त स्थळ पाहणी अहवालानुसार सदर जागेमध्ये सार्वजनिक स्मशानभूमी, सार्वजनिक शौचालय व स्मशानभूमी निवाराशेड इत्यादी सार्वजनिक बांधकाम केले असल्याचे दिसून येते. सद्यस्थितीत या जागेचा वापर भगत आळी येथील मुले खेळण्यासाठी करीत आहेत असे दिसून येते.<br>३) तसेच आवास येथील सदरची जागा ही बिन नंबर असलेली (अनसर्व्हे नंबर) जमीन आहे. या जागेमध्ये वैयक्तिक स्वरुपाचे कोणाचेही अतिक्रमण नाही. तसेच श्री. श्रीनिवास बाळाराम भगत यांचे अतिक्रमण दिसून आले नाही. तसेच सदर जागेवर सुमारे १२ ते १५ वर्षापुर्वी असलेल्या कांदळवन क्षेत्रामध्ये नक्की कोणी वृक्षतोड केली याबाबत कोणताही पुरावा उपलब्ध नाही. असे या कार्यालयास कळविलेले आहे. |
| ६. | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | कांदळवनाचा ऱ्हास हा सन २०१० पूर्वी झालेला आहे. |

| | | |
|---|---|---|
| ७. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलिस स्थानकाचे नांव | कांदळवनाचा ऱ्हास हा सन २०१० पूर्वी झालेला आहे. परंतु तक्रारदार यांनी अर्जात नमूद केलेप्रमाणे कांदळवनाची तोड केलेली व्यक्ती श्री. श्रीनिवास बाळाराम भगत हे मयत झाले असल्यामुळे त्यांचेविरुध्द मा. न्यायालयात फिर्याद दाखल करता येत नाही. |
| ८. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास ज्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नांवे व पत्ता | तक्रारदार यांनी अर्जात नमूद केलेप्रमाणे कांदळवनाची तोड केलेली व्यक्ती श्री. श्रीनिवास बाळाराम भगत हे मयत झाले असल्यामुळे त्यांचेविरुध्द मा. न्यायालयात फिर्याद दाखल करता येत नाही. |
| ९. | कोणत्या कायद्या अंतर्गत/कलमा अंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल करण्यात आला नाही. |

उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील चौकशी अहवालाची त्यासोबतची कागदपत्रे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी यांचे सहीची आहे.

3/2/23

(डॉ.पद्मश्री बैनाडे)
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**रायगड-अलिबाग**